महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.७१/पदभरती/का-४** **दिनांक १५-०५-२०२३**

## परिपत्रक क्र.५

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील विविध ७७२ पदे भरण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दिनांक १६/०२/२०२३ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज केलेल्या उमेदवारांची सामायिक परीक्षा (CBT/CBT-१) **रविवार दिनांक १६/०४/२०२३** रोजी घेण्यात आली. सदर परीक्षेची उत्तरतालिका (Answer key) दिनांक २०/०४/२०२३ रोजी उमेदवारांच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करुन देण्यांत आली असून उत्तरतालिकेबाबत हरकती असल्यास त्या दिनांक २०/०४/२०२३ ते २३/०४/२०२३ या कालावधीत Online पद्धतीने सादर करण्याबाबत उमेदवारांना कळविण्यात आले होते.

सदर कालावधीत उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या हरकतींच्या अनुषंगाने **Group-C मधील पदाकरिता झालेल्या परीक्षेत स्तंभ क्र.५ मध्ये नमूद एकूण ०२ चूकीच्या प्रश्नांकरिता असलेले पूर्ण गुण (०४) उमेदवारांना देण्याचा निर्णय** घेण्यात आला आहे.

| Sr. No. | Post Group | Objections Received | Valid Objections | Wrong Questions (Question ID) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Group-A | 57 | 0 | -- |
| 2 | Group-B | 53 | 0 | -- |
| 3 | Group-C | 49 | 2 | 630680205573<br>630680205605 |
| | **Total** | **159** | **2** | |

सुधारीत उत्तरतालिकेनुसार प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांचा सामायिक परीक्षेचा निकाल लवकरच जाहिर करण्यात येईल. तरी संबंधित सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
( दि. अं. दळवी )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.